# जिल्हा परिषद कर्मचा-याच्या अनाधिकृत गैरहजेरी बाबत

जिल्हा परिषदेकडील काही कर्मचारी कोणतीही आगाऊ परवानगी न घेता अगर रजेचे अर्ज न देता 5/6 वर्षे अनधिकृतपणे गैरहजर राहतात. तसेच काही स्थायी जिल्हा परिषद कर्मचारी आकस्मिकपणे अपरिहार्य कारणासाठी एक दोन महिन्याच्या रजेवर जातो. व रजा उपभोगल्यानंतर तो जेव्हा पुन्हा कामावर हजर होणेसाठी येतो तेव्हा काहीना काही निमीत्त करुन कामावर हजर करुन घेतले जात नाही. तसेच प्रत्येक अधिकारी त्याच्या वरिष्ठ अधिका-यांकडे संबधित कर्मचा-याला हजर होणेसाठी जाणेसाठी तोंडी सुचना देतात. अशा त-हेने कर्मचा-यास त्याने उपभोगलेल्या रजेनंतर त्यास कामावर हजर न करुन घेण्याचा अधिकार सक्षम अधिका-यास महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 अथवा इतर कोणत्याही नियमानुसार दिलेला नाही. अशा त-हेची कृती अत्यंत अनियमित असून त्यामुळे अशा कर्मचा-यांचा गैरहजेरीचा कालावधी प्रशासकिय कारणामुळे वाढतो व सदर गैरहजेरीचा कालावधी शक्तीचा कोळंबा म्हणुन नियमीत करावा लागतो. त्यामुळे शासनास व जिल्हा परिषदेस बरेच आर्थिक नुकसान सोसावे लागते. त्याची भरभाई करण्याची जबाबदारी सक्षम अधिका-यावर येते. याबाबत शासनाने खालील प्रमाणे सविस्तर सुचना दिलेल्या आहेत.

1) जे कर्मचारी एक महिन्यापेक्षा जास्त कालावधीतीसाठी रजेचे अर्ज नदेता गैरहजर असतील अशा कर्मचा-याला ताबडतोब कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी. तसेच अशा कर्मचा-याविरुध्द वेळीच विभागीय चौकशी चालू करण्यात यावी व योग्य ती कार्यपध्दती अवलंबून त्याच्या सेवा समाप्तीची अथवा त्यांना सेवेतुन काढून टाकण्याची कार्यवाही करावी.

2) जे कर्मचारी वैद्यकिय कारणास्तव गैरहजर असतील त्यांचा रजेचा कालावधी तीन महिन्याच्या पुढे वाढल्यास त्यांचा वैद्यकिय मंडळापुढे पाठविध्यात यावे व वैद्यकिय मंडळाच्या प्रमाणपत्राच्या आधारे त्यांना सेवेतुन काढून टाकण्याची कार्यवाही करावी.

3) जिल्हा परिषदेमधील शिक्षण विभागातील प्राथमिक शिक्षकांच्या बाबतीत विभागीय चौकशी किंवा वैद्यकिय मंडळा समोर पाठविण्या बाबतची कार्यवाही वेळीच केली गेली नाही तर संबधित गट शिक्षण अधिका-याला जबाबदार धरण्यांत यावे.